महाज्योती
ज्ञानदीप सततेवा

महाराष्ट्र शासन
इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022
दुरध्वनी क्रं. 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल mahajyotingp@gmail.com

**जा.क्र.** महाज्योती, नागपूर/ आस्था/862 /2023-24, **दिनांक :-** 26/05/2023

# परिपत्रक

**विषय :- पोलिस भरती परीक्षा पुर्व ऑफलाईन प्रशिक्षण - 2023 करिता तात्पुरती तिसरी प्रतिक्षा यादी प्रसिध्द करणेबाबत.**

महाज्योती या संस्थेद्वारे पोलिस भरती परीक्षा पुर्व ऑफलाईन प्रशिक्षण- 2023 दि.01/04/2023 पासून संबोधी अकादमी, औरंगाबाद व नागपूर या संस्थेमार्फत प्रशिक्षण सुरु करण्यात आलेले आहे. मात्र संवर्ग निहाय काही जागा रिक्त आहेत. रिक्त जागा भरुन प्रशिक्षण पूर्ण क्षमतेने पूर्ण करण्यासाठी गुणांकनानूसार तिसरी प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात येत आहे. तरी ज्या विद्यार्थ्यांची तिसरी प्रतिक्षा यादीनुसार निवड करण्यात आलेली आहे. त्यांना खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहे.

1. पोलिस भरती परीक्षा पुर्व प्रशिक्षणाकरिता तिसरी प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात येत असून रुजु होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांने संबोधी अकादमी औरंगाबाद व नागपूर यांचे कडे दि.24/05/2023 ते दि.31/05/2023 या कालावधीत खालील मुळ पत्रके प्रशिक्षण संस्थेत दाखवून ती तपासुन घ्यावीत व नोंदणी प्रक्रीया पुर्ण करावी. कागदपत्रांच्या छायाप्रतीचा एक संच प्रशिक्षण संस्थेत जमा करावा. तसेच दि.31/05/2023 नंतर उमेदवारांना प्रवेश प्रक्रिया करता येणार नाही.

**सदर मुळ कागदपत्रांची यादी खालील प्रमाणे आहे.**

1. 2 पासपोर्ट साईज फोटो
2. आधारकार्ड
3. जन्माचा दाखला/टि.सी. ची प्रत/ एस.एस.सी. सनद/ जन्म प्रमाणपत्र
4. जातीचे प्रमाणपत्र
5. वैध नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र
6. एच.एस.सी. उत्तीर्ण गुणपत्रिका / प्रमाणपत्र/ उच्च शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र
7. अधिवास / रहिवासी प्रमाणपत्र
8. बँक पासबुकची स्वच्छ झेरॉक्स प्रत (बँक खाते आधारकार्ड क्रमांकाशी संलग्न असणे आवश्यक आहे.)
9. 100 रुपयांचा बॉण्ड पेपर (बॉण्ड पेपरवर लिहावयाचा तपशील केंद्रामार्फत पुरविण्यात येईल)

- वरील सर्व कागदपत्रे मुळ स्वरुपात पडताळणी साठी व 2 झेरॉक्स कॉपी स्वसाक्षांकित (सेल्फ अटेस्टेड) केलेल्या सोबत आणाव्यात.

2. प्रशिक्षणाकरिता निवड झालेले उमेदवार ज्या दिनांकास **संबोधी अकादमी औरंगाबाद व नागपूर** या संस्थेत प्रशिक्षणाकरिता रुजू होतील त्या दिवसापासुन त्यांना महाज्योतीच्या धोरणानुसार विद्यावेतन लागू होईल. तथापि, प्रत्यक्ष प्रशिक्षणास 75% उपस्थिती असणाऱ्यांनाच विद्यावेतन देय राहील.

**संस्थेचा पत्ता व संपर्क करावयाचे अधिकारी यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे** :-

**औरंगाबाद येथील प्रशिक्षण केंद्राचा पत्ता** :- संबोधी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र, तिसरा मजला, निर्माण भारती सिटी सेंटर, शासकीय ग्रंथालयासमोर, निराला बाजार, औरंगाबाद

**नागपूर येथील प्रशिक्षण केंद्राचा पत्ता** :- संबोधी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र, तळ मजला, फॉर्च्यून मॉल, सिताबर्डी मेट्रो स्टेशन जवळ, नागपूर.

**औरंगाबाद येथील प्रशिक्षण केंद्राचे मोबाईल क्र.**

1. 7507743322
2. 8308161929
3. 9960506417

**नागपूर येथील प्रशिक्षण केंद्राचे मोबाईल क्र.**

1. 8087633055
2. 8087720600

3. प्रशिक्षणास रुजु होणाऱ्या विद्यार्थ्यांना निवास व्यवस्था, भोजन, इत्यादी सोय स्वत:च करावी लागेल याची नोंद घ्यावी.
4. दि.31/05/2023 पर्यंत प्रवेश प्रक्रिया पुर्ण करण्यात यावी. त्यानंतर प्रशिक्षणाकरिता रुजु होता येणार नाही. याची नोंद घ्यावी.
5. ज्या विद्यार्थ्यांनी पोलिस भरती व IBPS- PO / LIC-AAO या दोन्ही परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरिता पात्र विद्यार्थ्यांचा निवड यादीत आहे अशा विद्यार्थ्यांनी कोणत्याही एक प्रशिक्षणाची निवड करावी.

कोणत्याही माध्यमातुन व अंतीम निवड प्रक्रियेच्या तसेच प्रशिक्षणाच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवारांनी सादर केलेली माहिती चुकीची, दोषपूर्ण व दिशाभूल करणारी असल्यास किंवा या पूर्वी सदर योजनेचा लाभ घेतल्याचे आढळल्यास तसेच महाराष्ट्र राज्य शासनाच्या 'सारथी' या संस्थेच्या निवड यादीत समावेश असल्याचे आढळल्यास त्यांची निवड रद्द करण्यात येईल.

(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर

H:\Note.docx552